# म्यॅन्युअल - १७

कस्तुरबा रुग्णालयातील वैद्यकीय अभिलेख विभाग १.१०.१९७० साली स्थापण्यात आला. या विभागातील अभिलेखाची रचना vellors system नुसार करण्यात आली आहे. त्यामुळे रुग्णांकरिता वैद्यकीय उपचार तातडीने मिळतात. तसेच या पध्दतीमुळे वैद्यकीय वृंद तसेच वैद्यकीय विद्यार्थ्यांना रिसर्च करण्याकरिता होतो. या विभागामध्ये रोगमुक्त रुग्णांच्या वैद्यकीय कागदपत्रांचे (केस पेपर) अतिशय चोखपणे जतन केले जाते. त्यामुळे सदर केसपेपर वैद्यकीयवृंदाना आवश्यक असतात, तेंव्हा उपलब्ध होतात.

वैद्यकीय अभिलेख विभाग जो vellors system वर आधारित आहे. तो या रुग्णालयात प्रथम स्थापन करण्यात आला. जेणेकरुन केसपेपर पध्दतशीपणे वर्गवारीकरुन जतन केले जातात.

सदर विभागामार्फत विविध रोगांनी ग्रस्त असलेल्या रुग्णांवर उपचार केलेल्या रुग्णांची वर्गवारी करुन त्याचा अहवाल दैनंदिन, मासिक, वार्षिक इत्यादी स्वरुपात विविध संस्थांना / सार्वजनिक खात्यातील विविध संस्थांना संसर्गजन्य रोगांचा प्रार्दुभाव रोखण्याकरिता दिला जातो.

या विभागातील केस पपर्स रोगांनुसार क्रमांक (कोड नंबर) दिलेले असतात. आरोग्य खात्यातील वैद्यकीयवृंदांना वर्गवारीयुक्त माहिती देण्याकरिता रोग निदान शिट्स तयार करण्यात येतात.

एम.आय.सी. वैद्यकीय उपचाराचे खर्चाची परिपुर्ती, विविध आजारावरील व्याख्याने आयोजित करो, तक्रारीचे निवारण करणे, विविध विभागांना आवश्यक असणारी माहिती देणे.

वैद्यकीय अभिलेख विभागामध्ये खालीलप्रमाणे अभिलेख आहेत -

(१) बाहय रुग्ण विभाग केस पेपर्स

(२) रुग्ण दाखल / रोगमुक्त अभिलेख

(३) महत्वाचे अभिलेख, इ.सी.जी./क्ष-किरण/पॅथॉलॉजीकल रोगनिदान अहवाल

(४) वर्गवारी अभिलेख - (i) रुग्ण दाखल / उपचार केलेले (ii) रोगमुक्त

(५) सार्वजनिक आरोग्य खात्याला नोंदणीकृत संसर्गजन्य रोगांविषयी माहिती देणे

(६) मृतदेह मुंबई बाहेर नेण्यासाठी परवानगी देणे

सही/
कार्यकारी आरोग्य अधिकारी